**राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५% निधी थेट देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पेसा -२०१५ /प्र.क्र.१९/ का. १७**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई-४०० ०३२
दिनांक : **२१ एप्रिल, २०१५**

**<u>वाचा :</u>** १. शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई, क्र. पीआरआय-२०१०/प्र.क्र.१३०/पं.रा.-२, दिनांक ४ मार्च, २०१४.

२. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाची अधिसूचना क्र. आरबी/टीसी/ई-११०१९ (८९) (२०१३)/नोटिफिकेशन-४/११२०/२०१४, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४.

**<u>प्रस्तावना:</u>**

पंचायत (अनुसूचित क्षेत्राचा विस्तार) अधिनियम, १९९६ केंद्र शासनाने दिनांक २४ डिसेंबर, १९९६ रोजी अधिसूचित केला आहे. राज्यामध्ये साधारणत: आदिवासी उपयोजना क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये १५ जिल्हयातील ६० तालुक्यांमधील ७१७७ गावे व माडा व मिनी माडा क्षेत्रामध्ये १७ जिल्हयांमधील ६७ तालुक्यांतील १२५१ गावांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यात १३ जिल्हयांतील ५९ तालुक्यांतील २८३५ ग्रामपंचायती व ५९०५ गावे पेसा (PESA) क्षेत्रामध्ये येतात. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना सक्षम व आर्थिकदृष्टया सबळ करण्याकरिता राज्य शासनाने अनेक योजना राबविलेल्या आहेत. त्यामुळे राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देशात एक वेगळे स्थान प्राप्त झाले आहे. मा. राज्यपाल महोदयांनी भारतीय राज्यघटनेच्या अनुसूची ५ मधील परिच्छेद ५, उपपरिच्छेद ( १ ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन दि. ३० ऑक्टोबर, २०१४ अन्वये विविध कायद्यांच्या अनुषंगाने अधिसूचना निर्गमित केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (III) १९५९ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यामधील कलम ५४ B नंतर "be competent to exercise control over local plans and resources for such plan including the Tribal sub-Plan; Provided that not less than ५ % of the total Tribal sub-Plan funds of the respective annual plan shall be devolved to the Gram Panchayat in Scheduled Areas in proportion to their population; Provided further that the Panchayat shall utilize these funds for the purpose and to the extent as recommended by the Gram Sabha. Provided also that in case a Panchayat has more than one Gram Sabha these funds shall be utilized in proportion to the population of the respective Gram Sabhas." कलम अंतर्भूत करण्यात आलेले आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राप्त होणा-या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के निधी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित करण्याची तसेच याबाबत मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार मा. राज्यपाल महोदयांच्या संदर्भ क्रमांक २ वरील दिनांक ३० ऑक्टोबर, २०१४ च्या अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यासाठी मंत्रिमंडळाच्या दिनांक ९ एप्रिल, २०१५ झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना दरवर्षी आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५% निधी उपलब्ध करुन देण्याच्या योजनेस (पेसा ग्रामपंचायतींना ५ % थेट निधी योजना) मान्यता देण्यात येत आहे. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये या

योजनेसाठी सुमारे रु.२५० कोटी इतका निधी उपलब्ध होईल. सदरचा निधी खालीलप्रमाणे (अ) पायाभूत सुविधा, (ब) वन हक्क अधिनियम ( FRA ) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी, (क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण व (ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका या बाबींकरीता प्रत्येकी १/४ या प्रमाणात विनियोगात आणावा.

**(अ) पायाभूत सुविधा :**

१. संबंधित पेसा गावातील ग्रामपंचायत कार्यालये, आरोग्य केंद्रे, अंगणवाडया, शाळा, दफनभूमी, गोडाऊन, गावांचे अंतर्गत रस्ते व तत्सम पायाभूत सुविधा,

**(ब) वन हक्क अधिनियम (FRA) व पेसा ( PESA ) कायद्याची अंमलबजावणी:**

१. आदिवासींनी त्यांच्या उदरनिर्वाहाच्या व्यवसायाच्या संदर्भात प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण/मार्गदर्शन करणे.
२. गावतळी विकास किंवा मत्स्यपालन व्यवसाय / मत्स्यबीज खरेदी.
३. सामाईक जमिनी विकसित करुन देणे.
४. गौण पाणी साठयाचे व्यवस्थापन.
५. सामाईक नैसर्गिक साधनसंपदा व सामाईक मालमत्ता विकसित करणे

**(क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण**:

१. सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे.
२. गावामध्ये स्वच्छता राखणे.
३. सांडपाणी व्यवस्थेकरीता गटारे बांधणे व त्याची देखभाल करणे.
४. शुध्द पिण्याचे पाणी पुरविणे.

**(ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका:**

संबंधित ग्रामपंचायतीमधील गावांच्या ग्रामसभांनी वरील (अ) व (क) क्षेत्रांमधून त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड करावी. ग्रामसभांनी कामाची निवड करणे म्हणजेच त्या कामास ग्रामसभेची प्रशासकीय मान्यता समजावी. ग्रामसभेने निवड केलेल्या रुपये ३ लक्ष पेक्षा कमी मुल्याच्या कामास स्वतंत्र तांत्रिक मान्यता आवश्यक असणार नाही व रु. ३ लक्ष पेक्षा अधिक मूल्य असलेल्या कामासाठी तांत्रिक मान्यता घेण्याची पध्दती परिच्छेद -४(६) प्रमाणे राहील.

मात्र उपरोक्त ( ब ) व ( ड ) येथील क्षेत्रामधील त्या-त्या वर्षाकरिता कामाची निवड ग्रामसभेने केल्यानंतर त्याकरिता लागणारा निधी ग्रामसभेची अनुमती घेऊन संबंधित गावांच्या संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्राम वन समिती किंवा सामुहिक वन हक्कांसाठी स्थापन केलेल्या समितीस देण्यात यावा.

सदर योजनेबाबत तपशीलवार मार्गदर्शक सूचना सोबतच्या “परिशिष्ट” मध्ये देण्यात आल्या आहेत.

२. सन २०१५-१६ या आर्थिक वर्षानंतर येणा-या प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये आदिवासी उपयोजनेच्या एकूण मंजूर नियतव्ययाच्या ५% निधीपैकी ५० % इतका निधी ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात वितरित करण्यात येईल व उर्वरित ५० % निधी ग्रामपंचायतींना त्यांच्या खालील क्षेत्रात केलेल्या कामगिरीच्या आधारे देय राहील :-

अ. अतिकुपोषित बालकांचे प्रमाण कमी करणे,
आ. बालविवाहावर बंदी आणणे,
इ. शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करणे,
ई. वन जमिनीवर नव्याने अतिक्रमण थांबविणे इ.

वरील अ ते ई मध्ये नमूद केलेल्या क्षेत्रातील कामगिरी निश्चित करण्याकरीता खालीलप्रमाणे संबंधित सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील :-

१) मध्यम व अतितीव्र कुपोषित बालकांची मागील वर्षातील सुरुवातीला असलेली संख्या व त्या वर्षाच्या ३१ मार्च अखेर असलेली संख्या याबाबतच्या तपशिलासह कुपोषित बालकांचे प्रमाण कमी झाले असल्याचे संबंधित बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प यांचे प्रमाणपत्र.

२) गेल्या वर्षामध्ये गावात झालेल्या विवाहामध्ये एकही बालविवाह झाला नाही याबाबत संबंधित ग्राम सचिवाचे प्रमाणपत्र.

३) गावातील ५ ते १५ वयोगटातील मुलींची संख्या, त्यातील शाळेत जाणा-या मुलींची इयत्तानिहाय संख्या याबाबतच्या तपशिलासह शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी झाले असल्याबाबतचे संबंधित गट शिक्षण अधिका-याचे प्रमाणपत्र.

४) वन जमिनीवर नव्याने अतिक्रमण न झाल्याबाबत संबंधित वन विभागाच्या वन परिक्षेत्र अधिका-याचे प्रमाणपत्र.

वरील अधिका-यांना संबंधित ग्रामपंचायतीने मागणी केल्यानंतर १५ दिवसांत तपासणी करुन वस्तुस्थितीवर आधारीत प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

### ३. ग्रामपंचायतीला निधी वितरीत करण्याची पध्दती :

सर्व ग्रामपंचायतीचे बचत खाते क्रमांक व त्या ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती यांची लोकसंख्या याबाबतची माहिती संबंधित जिल्हा परिषद आदिवासी विकास विभागाला उपलब्ध करुन देईल. सदर माहितीच्या आधारे आदिवासी उपयोजनेचा निधी आदिवासी विकास विभागामार्फत राज्य स्तरावरुन थेट ग्रामपंचायतींना RTGS व्दारे लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायतीच्या बँक खात्यामध्ये थेट वितरित करण्यात येईल.

### ४. निधीच्या विनियोगासाठी वार्षिक आराखडा तसेच प्रशासकीय तांत्रिक मान्यतेची पध्दती :

१. प्रत्येक वर्षी दिनांक १ मे रोजीच्या ग्रामसभेमध्ये निधीच्या विनियोगाचा वार्षिक नियोजनाचा आराखडा निश्चित करण्यात येईल.
२. आराखडा तयार करताना मागील दोन वर्षातील कामांची स्थिती व पुढील वर्षातील गरजा विचारात घेण्यात येतील.
३. ग्राम पंचायतीच्या क्षेत्रातील प्रत्येक गाव व वाडी /पाडानिहाय आराखडा तयार करून त्यानंतर त्यांचे संकलन ग्रामपंचायत स्तरावर करण्यात येईल.
४. ग्रामसभेच्या ठरावानुसार निवड झालेल्या कामास स्वतंत्र प्रशासकीय मान्यता आवश्यक असणार नाही.

५. ग्रामसभेने मान्यता दिलेल्या रु. ३ लक्ष पेक्षा कमी मूल्याच्या कामास स्वतंत्र तांत्रिक मान्यता आवश्यक असणार नाही.

६. रु. ३ लक्ष पेक्षा अधिक मूल्याच्या कामांसाठी तांत्रिक मान्यता गटविकास अधिकारी यांनी ठरवून दिलेल्या तांत्रिक अधिका-यामार्फत देण्यात यावी. तसेच वन विभागाशी निगडित काम असल्यास उप वनसंरक्षक किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या तांत्रिक अधिका-यामार्फत देण्यात यावी.

७. ग्रामस्तरावर घ्यावयाच्या सर्वसाधारण कामांची यादी करून तांत्रिक मान्यता आवश्यक असलेल्या कामांची **यादी-अ** व तांत्रिक मान्यता आवश्यक नसलेल्या कामांची **यादी-ब** सोबत जोडली आहे.

५. या योजनेंतर्गत निधी वितरणाबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:१७७/व्यय-१४, दिनांक १७ एप्रिल, २०१५, ग्राम विकास विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक:२०८/प्र.स.(ग्रा.वि.), दिनांक १२ मार्च, २०१५ व वन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: ५५५/प्र.स.(वने), दिनांक १६ मार्च, २०१५ नुसार प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०४२०१७४३३५५९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajagopal Devara

Digitally signed by Rajagopal Devara
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, cn=Rajagopal Devara
Date: 2015.04.21 14:58:42 +05'30'

**(राजगोपाल देवरा)**
सचिव, आदिवासी विकास

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई-३२
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. मा. मंत्री/ राज्य मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
४. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री
५. सर्व विधानसभा / विधान परिषद सदस्य
६. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर
८. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई / नागपूर
९. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
१०. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
११. सचिव ( वने ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर

१३. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे
१४. आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१६. विभागीय आयुक्त, कोकण / नाशिक/ पुणे/ औरंगाबाद/अमरावती व नागपूर
१७. जिल्हाधिकारी, ठाणे/ पालघर/ नाशिक/धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ नांदेड/ यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर
१८. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर /अमरावती/ नाशिक व ठाणे
१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/ पालघर/ नाशिक/धुळे/ नंदूरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ नांदेड/ यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर
२०. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय
२१. सर्व संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती
२२. सर्व संबंधित गट शिक्षण अधिकारी
२३. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२४. सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई -३२
२५. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
२६. वित्त विभाग, (व्यय १४ / अर्थ १९ )मंत्रालय, मुंबई -३२
२७. सर्व मंत्रालयीन विभाग
२८. सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३
२९. कक्ष अधिकारी, का-६, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
३०. निवड नस्ती (का.१७)

## शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पेसा २०१५/ प्रक्र.१९/ का-१७,

## दिनांक २१ एप्रिल, २०१५ चे परिशिष्ट

आदिवासी उपयोजनेंतर्गत प्राप्त होणा-या एकूण नियतव्ययाच्या ५ % निधी अनुसुचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीनां उपलब्ध करुन देणे, निधीचा विनियोग इत्यादी संदर्भात मार्गदर्शक सूचना.

**१.ग्राम पंचायतींना निधी वितरीत करण्याची पद्धती:**

१. आदिवासी उपयोजनेतील ५ %निधी ग्राम पंचायतींना अबांधित ( Untied) स्वरुपात देण्यात येईल.

२. ग्राम पंचायतींना निधीचे वितरण २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार करण्यात येईल.

३. ग्राम पंचायतीला निधी वितरीत करताना ग्राम पंचायत क्षेत्रातील प्रत्येक महसुली गाव तसेच वाडी /पाडा याकरिता वापरावयाच्या निधीचे प्रमाण २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार निश्चित करून देण्यात येईल.

४. सर्व ग्रामपंचायतीचे बचत खाते क्रमांक व त्या ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती यांची लोकसंख्या याबाबतची माहिती जिल्हा परिषद आदिवासी विकास विभागाला उपलब्ध करुन देईल. सदर माहितीच्या आधारे आदिवासी उपयोजनेचा निधी आदिवासी विकास विभागाकडून राज्य स्तरावरून थेट ग्राम पंचायतींना RTGS द्वारे लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायतीच्या बॅक खात्यामध्ये RTGS व्दारे थेट वितरित करण्यात येईल.

५. प्रत्येक ग्राम पंचायतीस सदर निधीसाठी राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र खाते उघडणे बंधनकारक राहील.

६. रु .पाच लक्षच्या आतील निधी दोन हप्त्यात व त्यापेक्षा जास्त निधी तीन हप्त्यात अदा करण्यात येईल.

**२. ग्राम पंचायत स्तरावर निधीचे नियंत्रण व व्यवस्थापन:**

१. ग्राम पंचायतीच्या खात्यातून निधी ग्रामसभा कोषामध्ये वर्ग करण्यात येईल.

२. ग्रामसभा कोष समिती प्राप्त निधीचे व्यवस्थापन करेल.

३. निधीच्या विनियोगावर ग्रामसभेचे संपूर्ण नियंत्रण राहील व ग्रामसभेच्या ठरावाशिवाय सदर निधीतून कोणताही खर्च करता येणार नाही.

४. पेसा गावे घोषित होईपर्यंत सदर निधी ग्राम पंचायतीच्या एकत्रित ग्रामसभेच्या नियंत्रणाखाली राहील.

५. पेसा गावे घोषित झाल्यावर प्रत्येक गावासाठी निश्चित केलेल्या निधीचा विनियोग संबंधित गावाची ग्रामसभा ठरवेल.

६. ग्राम पंचायतीला प्राप्त झालेला निधी महसुली गावे, पाडे /वस्त्या यांना निश्चित केलेल्या प्रमाणानुसारच खर्च करणे बंधनकारक राहील.

७. सदर निधीबाबतचे सर्व लेखे हे महाराष्ट्र ग्रामपंचायतीसंबंधीचे उपबंध (अनुसूचित क्षेत्रांवर विस्तारित करण्याबाबत), नियम,२०१४ प्रकरण तीन, ग्रामसभा लेखे मधील नियम क्रमांक १४,१५ व १६ नुसार ठेवावीत.

८. फक्त ज्या ग्रामपंचायती, स्थानिक वन व्यवस्थापन समिती यांचे मागील एक वर्षाचे लेखा परीक्षण, स्थानिक निधी लेखा परीक्षा पथकाकडून झाले नसल्यास त्रयस्थ लेखा परिक्षकाकडून लेखा परीक्षण करुन घेणे बंधनकारक आहे.

९. ज्या ग्रामपंचायतीचे किंवा संयुक्त वन व्यवस्थापन समिती, ग्राम वन समिती किंवा सामुहिक वन हक्कांसाठी स्थापन केलेल्या समितीचे गेल्या वर्षाचे लेखा परीक्षण झालेले नसेल किंवा लेखा परीक्षण अहवालामध्ये प्रतिकूल शेरे असतील तर ते पुढील वर्षाचा निधी मिळण्यास पात्र असणार नाहीत.

१०. कोणत्याही परिस्थितीत मागील एका आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण त्रयस्थ लेखा परिक्षकाकडून करण्यात आलेले आहे त्यांनाच हा निधी वितरित करण्यात यावा.

**३.निधीच्या विनियोगाचे सूत्र, कालमर्यादा:**

**१.** ग्राम पंचायतीला प्राप्त झालेल्या निधीचा विनियोग खालील सूत्रानुसार करणे बंधनकारक राहील:

अ. पायाभूत सुविधा : १/४ निधी

ब. पेसा व वनहक्क अंमलबजावणी : १/४ निधी

क. स्वच्छता, आरोग्य, शिक्षण व अनुषंगिक विषय : १/४ निधी

ड. वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका **:** १/४ निधी

**२.** उपरोक्त पैकी प्रत्येक वर्षी एका क्षेत्राची निवड करून त्यातील कामे राबविता येतील.

**३.** पुढील वर्षांमध्ये इतर तीन क्षेत्रातील कामे केल्यावरच पुन्हा पहिल्या क्षेत्रातील काम घेता येईल.

**४.** प्रत्येक वर्षी प्राप्त निधीचा खर्च पूर्ण करण्यासाठी ग्राम पंचायतीस दोन वर्षे कालावधी उपलब्ध राहील ( चालू व पुढील वर्ष ).

**४. निधीच्या खर्चातील अननुज्ञेय बाबी :**

सदर निधीतून खालील बाबींकरिता खर्च करता येणार नाही.

- सदर निधीतून वैयक्तिक लाभ ( खालील अपवाद वगळता ) देऊ नये:
  - ➢ अपंगाना उपकरणे /तत्सम सहाय्य.
  - ➢ अल्प व अत्यल्प भूधारकांना शेतजमीन विकास ,जलस्त्रोत विकासासाठी सहाय्य.
- सदर निधीचा वापर करताना आदिवासी उपयोजनेतील नियमित योजना, शासनाच्या विविध विभागांच्या नियमित योजना, जिल्हा वार्षिक योजना, वित्त आयोगाचे अनुदान इत्यादीतील तरतुदींची व कामांची पुनरावृत्ती (Duplication) होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच एकाच कामासाठी किंवा कामाच्या वावासाठी अन्य नियमित योजनेमधील निधीचा व या योजनेमधील निधीचा वापर होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.
- ५ %निधीतून प्रत्येक आर्थिक वर्षात होणाऱ्या एकूण खर्चामध्ये बांधकामावरील खर्चाचे प्रमाण ४० %पेक्षा अधिक असू नये.
- रस्त्याची कामे केवळ खालील मर्यादेतच घ्यावीत:
  - ➢ ग्राम पंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शाळा, दहन-दफन भूमी व तत्सम पायाभूत सुविधा, गावाचे अंतर्गत रस्ते.
  - ➢ वैयक्तिक घरांना जोडणारे रस्ते सदर निधीतून घेऊ नयेत.
- ग्राम पंचायत प्रवेशद्वार अथवा तत्सम निव्वळ सुशोभीकरणाची कामे सदर निधीतून करू नयेत.
- ग्राम पंचायतीच्या कर संकलनाचे उद्दिष्ट )जसे पाणीपट्टी, मालमत्ता कर वसुली (अथवा स्वत:च्या महसुलातून करावयाचा खर्च) जसे वीज बिल अदायगी (यामध्ये कमी पडणारी रक्कम भरून काढण्यासाठी सदर निधीचा वापर करू नये.
- एखाद्या कामातील लाभार्थी हिस्स्याची (Beneficiary Contribution) रक्कम भरण्यासाठी सदर निधीचा विनियोग करू नये.
- कोणतेही सण /समारंभ /धार्मिक विधी यासाठी सदर निधीचा वापर करू नये.
- आदिवासी उप योजनेच्या मूळ तत्वांना अनुसरून, सदर निधीचा वापर सुस्पष्टपणे आदिवासी जनतेच्या कल्याणाकरिता होईल याची दक्षता घ्यावी व कोणत्याही परिस्थितीत इतर कारणासाठी त्याचा अपव्यय होणार नाही याची खबरदारी घ्यावी .

**५. निधीच्या खर्चातील अनुज्ञेय बाबी:**

- रोजगार विकासाकरीता नाविन्यपूर्ण उपक्रम.
- ग्राम पंचायतीच्या उत्पन्न वाढीसाठीचे उपक्रम.
- सार्वजनिक सुविधा केंद्र ,धान्य गिरणी ,अथवा सार्वजनिक उपयोगाच्या वस्तू /सुविधा.
- मध्यान्ह भोजन उपक्रमाचे बळकटीकरण ,वैद्यकीय विशेषज्ञांकडून आरोग्य तपासणी (specialized health check-up), प्रसुतीपूर्व गर्भवती स्त्रियांची काळजी ( ANC services), ई-शिक्षण ( e-learning) , डिजिटल शाळा ,अशा स्वरूपाचे उपक्रम.
- परिसरातील ग्राम पंचायतींनी एकत्र येऊन स्थानिक परिस्थितीनुसार ठरविलेली कामे जसे सिंचन ,पडकाई , दूरसंचार ,दळण-वळण ,इत्यादी.
- नियमित योजनांतील तरतुदीस पूरक स्वरूपातील कामे जसे -रोजगार हमी ,पाणलोट विकास ,कृषी विकास ,लघु/सूक्ष्म सिंचन ,मत्स्य पालन ,पशु /दुग्ध व्यवसाय ,वनीकरण ,वन व्यवस्थापन ,घन व द्रव कचरा वर्गीकरण व व्यवस्थापन ,इत्यादी योजनांशी मेळ घालून सामुदायिक संसाधनांचे व्यवस्थापन व उपजीविका निर्मितीसाठी घ्यावयाची कामे.
- एका पेक्षा अधिक ग्राम पंचायतींच्या सामायिक प्रस्तावांमध्ये पंचायत समिती /जिल्हा परिषदेने समन्वयाची भूमिका बजावावी तसेच नियमित योजनांतील निधीची जोड देण्याचा प्रयत्न करावा.
- आदिवासी क्षेत्रातील प्रमुख कार्यक्रमांची (Flagship) देखभाल.
- ग्राम पंचायत स्तरावरील विविध पायाभूत सुविधा, अत्यावश्यक सेवा व कर्मचारी याबाबत आदिवासी क्षेत्रासाठी वेगळे निकष नसल्यास अथवा दुर्गम क्षेत्र /विरळ लोकवस्ती यामुळे निकषांपेक्षा अधिक सुविधा / कर्मचारी आवश्यक असल्यास त्यासाठीची तरतूद.
- जिल्हा दर पत्रकानुसार (DSR) जी कामे जिल्हा मुख्यालयापासून जवळ /सपाट प्रदेशात होऊ शकतात परंतु दुर्गम /डोंगराळ आदिवासी क्षेत्रात त्याच दराने होऊ शकत नाहीत ( दळण-वळणाचा खर्च, अतिरिक्त मनुष्यबळाचा खर्च, इत्यादीमुळे ) त्यासाठी अतिरिक्त खर्चाची तरतूद.
- आदिवासी उपयोजनेतील नियमित योजनांना एकमेकाशी जोडून त्यांना अधिक परिणामकारक बनविण्यासाठी Bridge Funding या स्वरुपातील उपक्रम ( उदा.कौशल्य प्रशिक्षण व स्वयंरोजगार कर्ज )
- पेसा कायद्यातील तरतुदींनुसार १०० हेक्टरच्या आतील तलाव, गौण खनिजे व इतर नैसर्गिक /सांस्कृतिक साधन-संपत्तीचे व्यवस्थापन.
- वन हक्क कायद्यातील तरतुदींनुसार सार्वजनिक वन हक्काचे उपक्रम.
- गौण वन उपजावर प्रक्रिया व त्याची विक्री यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे.
- आदिवासी क्षेत्रात ग्राम पंचायतीच्या पुढाकाराने पर्यटन विकासाचे (Ecotourism/ Heritage Tourism) उपक्रम हाती घेऊन त्यायोगे स्थानिक युवक /महिला बचत गट यांना उत्पन्न वाढीचे स्त्रोत निर्माण करणे.
- अशा पर्यटन विकासासाठी वन विभाग तसेच आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, यांच्या सहाय्याने निसर्ग व संस्कृती माहिती केंद्र (Nature & Culture Interpretation Centres) उभारणे व चालविणे.
- देखभाली अभावी नादुरुस्त झालेल्या सुविधा पुन्हा कार्यान्वित करणे.
- ग्राम पंचायत व ग्राम सभा सक्षम करण्यासाठीचे उपक्रम.

**६. ग्रामसभा व ग्राम पंचायातीस तांत्रिक सहाय्याची व्यवस्था:**

१. प्रशासकीय व तांत्रिक सहाय्यासाठी व्यक्ती /संस्थांच्या सेवा घेण्याचे अधिकार ग्रामसभेस असतील.

२. ग्राम पंचायतीला प्राप्त होणाऱ्या निधीतील ५ %व्यवस्थापन निधीतून पायाभूत आराखडा, माहिती व्यवस्थापन, तांत्रिक सहाय्य, प्रशासकीय मनुष्यबळ, इत्यादीकरिता खर्च करता येईल.

३. प्रत्येक तालुक्यासाठी स्वयंसेवी संस्था निश्चित करण्यात येतील. स्वयंसेवी संस्थांना ग्रामसभांबरोबर तांत्रिक सहाय्य संस्था म्हणून संलग्न करण्यात येईल .पायाभूत आराखडा तयार करणे, ग्राम सभेस आराखडा सादर करणे, अंमलबजावणीतील तांत्रिक सहाय्य, इत्यादीमध्ये संस्था सहाय्य करतील .
४. ज्या ग्राम पंचायतीमध्ये पर्याप्त मनुष्यबळ उपलब्ध नसेल तेथे पेसा कायद्यातील तरतुदीनुसार गावातील सुयोग्य व्यक्तीस ग्रामसभेचे कामकाज बघण्यासाठी नेमता येईल.
५. पेसा व वनहक्क कायद्यान्वये निश्चित केलेल्या समित्या तसेच इतर गाव स्तरीय समित्या यांची भूमिका निश्चित करून ग्राम सभा त्यांचे सहाय्य घेईल.
६. ग्राम सभेने तांत्रिक सहाय्याची मागणी केल्यास संबंधित प्रशासकीय विभागांचे अभियंता, तांत्रिक व्यक्ती यांनी प्राधान्याने अशा सेवा पुरविणे बंधनकारक असेल.

**७. जनजागृती, प्रशिक्षण व क्षमता बांधणी**

१. सदर निधीच्या प्रभावी वापरासाठी ग्राम स्तरावरील संचेतन, जनजागृती, क्षमता बांधणी, ग्राम समित्यांचे गठन, तांत्रिक सहाय्य संस्थांची निवड, अभिलेख व्यवस्थापन, लेखा व्यवस्थापन, इत्यादी उपक्रमांसाठी पहिल्या वर्षी विशेष करून तरतूद करण्यात येईल.
२. सदर निधीबाबत सुलभ, बोली भाषेतील माहितीपर पुस्तिका तयार करून एप्रिल महिन्यातील ग्राम सभेत त्याचे वाचन करण्यात येईल.
३. पेसाचे ग्रामसभा स्तरीय प्रशिक्षण स्थानिक पातळीवर आयोजित करण्यात येईल.
४. पंचायत राज दिनाच्या निमित्ताने जनजागृती अभियान आयोजित करण्यात येईल.
५. राज्यातील तीन आदिवासी क्षेत्रांमध्ये आदिवासी पाडा परिषद आयोजित करण्यात येईल.

**८. निधीची उपयोगिता, अहवाल, सनियंत्रण व सामाजिक अंकेक्षण :**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे या निधीवर/कार्यक्रमांवर सनियंत्रण राहील.
२. ग्राम पंचायतीने मागील प्राप्त निधीची उपयोगिता सादर केल्याशिवाय पुढील निधी देय होणार नाही.
३. प्रत्येक ग्राम पंचायतीसाठी एक सनियंत्रण अधिकारी व एक तांत्रिक अधिकारी नेमण्यात येईल जे शक्यतो इतर तालुक्यातील असतील.
४. सनियंत्रण अधिकारी निधीच्या खर्चाची व फलनिष्पत्तीची त्रयस्थ पाहणी करून त्याचा अहवाल संबंधित पंचायत समितीस सादर करतील.
५. ग्राम पंचायतीने केलेली कामे /खर्च यामध्ये गैरव्यवहार आढळून आल्यास पुढील निधी देय होणार नाही.
६. सनियंत्रण अधिकाऱ्याचा अहवाल मान्य नसल्यास ग्राम पंचायतीस उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांचेकडे अपिल करण्याची संधी असेल.
७. ग्राम पंचायतीने केलेल्या प्रत्येक कामाचे सामाजिक अंकेक्षण करण्यात येईल.
८. सामाजिक अंकेक्षणाचा तपशिल ग्राम पंचायतीच्या रजिस्टरमध्ये नमूद करण्यात येईल तसेच सदरचा तपशिल सुचना फलकावर जाहीर करण्यात येईल.
९. सनियंत्रण अधिकारी सदर रजिस्टरची देखील नियमित पाहणी करतील.
१०. ग्रामसभेमध्ये निधीच्या खर्चास वार्षिक मान्यता घेण्यात येईल.
११. सनियंत्रण अधिकारी सदर ग्रामसभेस उपस्थित राहतील.
१२. महाऑनलाईनच्या मदतीने सदर निधीचे सनियंत्रण करण्यासाठी अभिलेख व लेखा व्यवस्थापनाची ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येईल.
१३. ग्राम सेवक व डेटा ऑपेराटर यांनी संग्राम प्रणाली, प्रियासॉफ्ट, इत्यादीमध्ये सर्व लेखे, अभिलेख, अद्ययावत ठेवणे आवश्यक राहील.

१४. ग्राम पंचायत स्तरावरील कामांच्या भौतिक व आर्थिक अहवालांचे संकलन पंचायत समिती व जिल्हा परिषदेमार्फत करून प्रत्येक जिल्ह्याचा एकत्रित अहवाल दरसाल ग्राम विकास विभागास सादर करण्यात येईल.

१५. ग्राम विकास विभागामार्फत जिल्ह्यांच्या अहवालांचे संकलन करून एकत्रित अहवाल दरवर्षी आदिवासी विकास विभागास सादर करण्यात येईल .

**९.ग्राम पंचायतींच्या कामगिरीवर आधारित निधी:**

१. प्रथम वर्षी १०० %निधी ग्राम पंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात वितरीत करण्यात येईल.

२. दुसऱ्या वर्षापासून पुढील प्रत्येक वर्षी ५० %निधी ग्राम पंचायतींना त्यांच्या कामगिरीनुसार देय असेल.

३. या करिता खालील प्रकारचे निकष विचारात घेण्यात येतील:

   **अ.** अतिकुपोषित बालकांचे प्रमाण कमी करणे ( Reduction in SAM )

   **आ.** बालविवाहावर बंदी आणणे ( Reduction in child marriages )

   **इ.** शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण कमी करणे ( Reduction in drop-out of girls from schools)

   **ई.** वन जमीनीवर नव्याने अतिक्रमण थांबविणे इ. ( No fresh encroachment on forest land, etc.)

४. प्रोत्साहन निधी ( Incentive Fund ) हा खेळत्या स्वरूपाचा राहील व एकाच ग्राम पंचायतीस तो वारंवार देय होणार नाही.

५. प्रोत्साहन निधी (Incentive Fund) करिता ग्राम पंचायतीची कर वसुली उद्दिष्टानुसार असणे आवश्यक राहील.

६. तसेच सदर निधीस ग्राम पंचायतीने काही स्वनिधीची जोड देणे आवश्यक राहील.

**१०. सर्वसाधारण बाबी**

१. सदर निधीबाबत प्रथम वर्षातील अनुभवाचा विचार करून पुढील वर्षी सुधारित मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात येतील.

२. ग्राम पंचायतीस दिलेले अनुदान पूरक स्वरूपाचे असल्याने प्रशासकीय विभागांनी त्याकडे नियमित योजनांतील तरतुदीस पर्याय या दृष्टीने पाहू नये.

३. जिल्हाधिकारी यांना आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या सेवा सदर निधीच्या विनियोगासाठी वर्ग करण्याचे अधिकार असतील.

४. महसुली गावे घोषित करण्याची प्रक्रिया जलद पूर्ण करण्यात यावी.

५. पेसा नियमावलीनुसार पेसा गावे व गाव ग्रामसभा घोषित करण्याची प्रक्रिया जलद पूर्ण करण्यात यावी.

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पेसा २०१५/ प्रक्र.१९/ का-१७,**
**दिनांक २१ एप्रिल, २०१५ चे सहपत्र**

**यादी - अ**

**तांत्रिक मान्यतेची आवश्यक असलेल्या १० कामांची यादी.**

१. सिंमेट नाला बंडीग
२. इमारतीचे बांधकाम, साठवणूकीकरीता खोली बांधणे, अंगणवाडी, समाजमंदिर इ. बांधकाम
३. मोठया गावांकरीता मलनिसा:रण, सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारणे.
४. शेतीकरीता जलसिंचन प्रकल्प
५. सिंमेट कॉंक्रिट चे अंतर्गत रस्ते, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर करुन रस्ते बांधणे
६. सौरउर्जा निर्मिती संयंत्र
७. शेतीयोग्य जमीन तयार करणे
८. पूरनियंत्रण भिंती बांधणे
९. हिंस्त्र श्वापदांपासून सरंक्षणकरीता भिंत बांधणे
१०. भूमिगत गटारे

*********

**शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. पेसा २०१५/ प्रक्र.१९/ का-१७,**
**दिनांक २१ एप्रिल, २०१५ चे सहपत्र**

**यादी -ब**

**तांत्रिक मान्यतेची आवश्यकता नसलेल्या ३२ कामांची यादी**

१. क्षमता बांधणी आणि स्थळ पाहणी
२. गरजू शेतक-यांकरीता शेतीविषयक औजारांचा सामुहिक वापर
३. ई-शिक्षण / डिजीटल शिक्षण प्रणाली
४. स्पर्धा परिक्षाबाबत पुस्तके असलेले सुसज्ज ग्रंथालय
५. सुधारीत बि-बियाणे प्रक्रिया, सेंद्रिय खताचे उत्पादन
६. भूमिहिन कुटुंबाना शेळीपालन
७. आरोग्य तपासणी शिबीर,पशुसंवर्धन तपासणी शिबीर आयोजित करणे
८. बचत गट, युवक व कुमारवयीन मुली यांना कौशल्य विकास प्रशिक्षण
९. सामुहिक विवाह सोहळा
१०. कंपोस्ट खताचे खड्डे, घन कचरा व्यवस्थापन, कचरा गोळा करणे, त्यांची विभागणी करुन खत निर्मिती करणे.
११. चारा निर्मिती
१२. दुधाळ जनावरांपासून दुध व दुग्धजन्य पदार्थाचे उत्पादन,
१३. वनराई बंधारा, शेत तळे
१४. सामाजिक वनीकरण
१५. प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी डेस्क बेंच,शैक्षणिक साहित्य व इतर
१६. अंगणवाडी व शाळेमध्ये प्रसाधनगृहे
१७. आठवडी बाजारामध्ये पुरविण्यात येणा-या सोई-सुविधा
१८. मत्स्यव्यवसाय
१९. अंगणवाडी,शाळा व ग्रामपंचायत कार्यालय आवारात भिंत बांधणे
२०. अंगणवाडीमध्ये किचन शेड उभारणे
२१. सौर ऊर्जेवर आधारीत संयंत्रे उभारणे
२२. जलशुध्दीकरण, जलप्रक्रिया प्रकल्प राबविणे
२३. पिण्याचे पाण्याकरीता कूपनलिका बांधणे
२४. जल मिटर बसविणे
२५. जनजागृती, दंवडी व इतर सूचना ग्रामस्थापर्यंत पोहचविण्याकरीता ध्वनी प्रक्षेपक बसविणे
२६. ग्राम पंचायत व शाळेमध्ये संगणक बसविणे
२७. अंगणवाडीमध्ये शालेय पूर्व साहित्य
२८. ग्रामसभाचे बळकटीकरण, अभिलेख जतन
२९. प्रौढ साक्षरता, निरंतर शिक्षण
३०. आदिवासी समाजाच्या रुढी, परंपरा व संस्कृतीचे जतन
३१. जल तलाव, तळी यांची दुरुस्ती व पाण्याचा अनुकूल वापर
३२. अपंगाकरीता वैयक्तिक लाभाच्या योजना

*******